# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.विधी समिति
## कार्यपत्रिका क्रमांक : २१
## सभावृत्तांत

दिनांक : ७/५/२०१० वेळ : दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षीक सभा शुक्रवार दि.७/५/२०१० रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.एकनाथ मोटे
३. मा.बारणे सिद्धेश्वर बाळासाहेब
४. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
६. मा.खोमणे लता हनुमंत
७. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

याशिवाय मा.देशमुख-सहा.आयुक्त,मा.काळे-नगरसचिव,मा.ढगे,मा.सवणे, मा.लडकत,मा.जाधव-कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-**

विषय क्रमांक :- १८) कासारवाडी वॉर्ड क्र.१०० महिला शाळेमध्ये विविध कार्यक्रमासाठी सांस्कृतिक भवन बांधणेबाबत - मा.स्मिता गुंजेकर,मा.सिद्धेश्वर बारणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- १९) कासारवाडी वॉर्ड क्र.१०० स्विमींग पूल शेजारी महिलांकरिता व्यायामशाळा करणेबाबत - मा.स्मिता गुंजेकर,मा.सिद्धेश्वर बारणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-२०) उप-अभियंता (स्थापत्य)पदावरील पदोन्नतीबाबत - मा.सिद्धेश्वर बारणे, मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-२१) कै.प्रा.रामकृष्ण मोरे यांचे तैलचित्र लावणेबाबत - मा.सिद्धेश्वर बारणे, मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-२२) असाधारण रजेबाबत - मा.सिद्धेश्वर बारणे, मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-२३) श्री.भाऊसाहेब व्यंकट खैरे यांना प्रकल्पग्रस्तांच्या संवर्गातून आस्थापनेत कायमस्वरुपी सामावून घेणेबाबत - मा.सिद्धेश्वर बारणे, मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव...

------------------

ठराव क्रमांक :- २८२ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- प्रशासन
सुचक :-मा.एकनाथ मोटे अनुमोदक :-मा.सिद्धेश्वर बारणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/४५७/१० दि.१३/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शासन आदेशाप्रमाणे श्री.भ.द.घाडगे, वरिष्ठ लेखा अधिकारी यांची मुख्यलेखापरिक्षक पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार नेमणुक केली असून श्री.घाडगे यांना शासनाने दिनांक १० फेब्रुवारी २०११ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने गट अ (वरिष्ठ) पदावर पदोन्नती देवुन मुख्यलेखापरिक्षक,पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीने दि.१०/२/२०११ पर्यंतच्या नियुक्तीस तसेच शासनाचे नगरविकास विभागाची मान्यता प्राप्त होईल या उमेदमान्यतेवर दि.१०/२/२०११ पर्यंत करण्यात आलेल्या नियुक्तीस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २८३ विषय क्रमांक :- २
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- प्रशासन
सुचक :-मा.एकनाथ मोटे अनुमोदक :-मा.सिद्धेश्वर बारणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/४५५/१० दि.१३/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

श्री.सुभाष डुंबरे, अतिरिक्त आयुक्त यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ०२/४/२०१० पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेची मागणी अमान्य करणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २८४ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- प्रशासन
सुचक :-मा.लता खोमणे अनुमोदक :-मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/४६५/१० दि.१६/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.शहाजी पवार, सहा.आयुक्त यांना दि.२३/३/२०१० पासून पुढे ०१ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २८५ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- स्थापत्य उद्यान
सुचक :-मा.एकनाथ मोटे अनुमोदक :-मा.सिद्धेश्वर बारणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/जा/कावि/२७०/१० दि.१५/४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ड प्रभाग क्षेत्रातील उद्यानामधील किरकोळ दुरुस्तीची कामे लहान विकासाची स्थापत्य विषयक कामे करणेकामी र.रु.११,४०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २८६ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- स्थापत्य उद्यान
सुचक :-मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :-मा.वसंत लोंढे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/जा/कावि/२६९/१० दि.१५/४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क प्रभाग क्षेत्रातील उद्यानामधील स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी र.रु.११,४८,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २८७ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- स्थापत्य उद्यान
सुचक :-मा.लता खोमणे अनुमोदक :-मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/स्था/२६४/१० दि.१२/४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब प्रभाग क्षेत्रातील उद्यानांमधील किरकोळ दुरुस्तीची कामे व लहान स्वरुपाची स्थापत्य विषयक विकासाची कामे करणेकामी र.रु.११,८०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २८८ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- स्थापत्य अ मुख्यालय
सुचक :-मा.एकनाथ मोटे अनुमोदक :-मा.सिद्धेश्वर बारणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अ.मु/६२/१० दि.७/४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्राधिकरण प्रभाग क्र.४९ मध्ये टिळक रस्त्यावरील बिग इंडीया ते संत ज्ञानेश्वर चौक (भेळ चौक) पर्यंतच्या रस्त्याचे फुटपाथसाठी पेव्हर ब्लॉक बसविणेकामी र.रु.२४,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २८९ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- पाणीपुरवठा क प्रभाग
सुचक :-मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :-मा.वसंत लोंढे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/कप्र/६२५/१० दि.२०/४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दिघी मॅगझिन उंच टाकी कार्यान्वीत करणेचे दृष्टीने पाणीपुरवठा होणा-या भागात आवश्यकतेनुसार वितरण नलिका पुरविणे व टाकणेकामी र.रु.४९,८१,१२९/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २९० विषय क्रमांक :- ९
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- पाणीपुरवठा क प्रभाग
सुचक :-मा.लता खोमणे अनुमोदक :-मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/कप्र/६२४/१० दि.२०/४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भोसरी विभागातील वॉर्ड क्र.१६ रामनगरी इ.भागात ठिकठिकाणी डी.आय. पाईपलाईन पुरविणे व टाकणेकामी र.रु.४९,९९,९४७/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २९१ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- पाणीपुरवठा क प्रभाग
सुचक :-मा.एकनाथ मोटे अनुमोदक :-मा.सिद्धेश्वर बारणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/कप्र/६२३/१० दि.२०/४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दिघी प्रभाग क्र.१३ मध्ये पाणी पुरवठा विषयक कामे करणे (ठिकठिकाणी डी.आय.पाईप लाईन टाकणे ) कामी र.रु.४९,९५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २९२ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- प्रशासन
सुचक :-मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :-मा.वसंत लोंढे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/२अ/कावि/२१९/१० दि.२१/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.पुपले लिंगोजी विठ्ठलराव, इलेक्ट्रीक मोटार पंप ऑपरेटर यांनी राजीनामा मंजूर करणेबाबत केलेली विनंती, नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार मनपा कोषागारात भरलेले एक महिन्याचे मुळ वेतन, सह शहर अभियंता (वि/यां) व कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचेकडील अहवाल इ.बाबी विचारात घेउन श्री.पुपले लिंगोजी विठ्ठलराव यांचा गैरहजर कालावधी विनावेतनी करुन आदेशाच्या दिनांकापासून त्यांचा राजीनामा मंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- २९३ विषय क्रमांक :- १२
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- प्रशासन
सुचक :-मा.लता खोमणे अनुमोदक :-मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/४७९/१० दि.२२/०४/२०१०
विषय - उपअभियंता (स्थापत्य) पदावर पदोन्नतीने करावयाच्या नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक १२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २९४ विषय क्रमांक :- १३
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- जलशुद्धीकरण केंद्र
सुचक :-मा.एकनाथ मोटे अनुमोदक :-मा.सिद्धेश्वर बारणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/पापु/४३/१० दि.२१/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

निगडी पेठ से.२३ येथील जलशुध्दीकरण टप्पा - २ खाजगी ठेकेदारामार्फत चालविणेकामी र.रु.३३,६०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २९५ विषय क्रमांक :- १४
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- प्रशासन
सुचक :-मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :-मा.वसंत लोंढे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/१/कावि/४८९/१० दि.२३/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.अशोक मुंढे यांची दिनांक २६/६/२००९ पासून दिनांक ३१/८/२००९ पर्यंतच्या कालावधीसाठी अधिसंख्य असलेले सहा.आयुक्त या अभिनामाचे तात्पुरत्या स्वरुपातील पद निर्माण करुन सदर पदावर नियुक्ती करणेस व महानगरपालिका आस्थापनेवर सहा.आयुक्त या पदावर कार्यरत असलेले अधिकारी श्री.बी.एन कांबळे हे महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार दि.३१/०८/२००९ रोजी सेवानिवृत्त झाले असल्याने सहा.आयुक्त या अभिनामाचे ०१ पद रिक्त झालेले असल्याने सदरच्या रिक्त झालेल्या पदावर श्री.अशोक मुंढे यांची दि.०१/९/०९ पासून ०१ वर्ष कालावधीसाठी नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २९६ विषय क्रमांक :- १५
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- जलशुद्धीकरण केंद्र
सुचक :-मा.लता खोमणे अनुमोदक :-मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/पापु/५८०/१० दि.१२/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जलशुध्दीकरण केंद्र से.नं.२३ येथील टप्पा ३ संपवेलवर वाढीव पंपहाउसचे बांधकाम करणेकामी र.रु.६९,८२,८००/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २९७ विषय क्रमांक :- १६
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- स्थापत्य उद्यान
सुचक :-मा.एकनाथ मोटे अनुमोदक :-मा.सिद्धेश्वर बारणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/स्था/२७/१० दि.२६/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

अ प्रभागातील उद्यानामधील स्थापत्यविषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी र.रु.११,७६,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २९८ विषय क्रमांक :- १७
दिनांक :- ०७/५/२०१० विभाग :- पाणीपुरवठा क प्रभाग
सुचक :-मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :-मा.वसंत लोंढे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६८४/१० दि.२७/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.११ वडमुखवाडी येथे पाणीपुरवठा विषयक कामे करणे (ठिकठिकाणी डी.आय.पाईपलाईन टाकणे) कामी र.रु.४९,९६,१६९/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक :- २९९ विषय क्रमांक :- १८
दिनांक :- ०७/५/२०१०
सुचक :-मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :-मा.सिद्धेश्वर बारणे
संदर्भ :- मा.स्मिता गुंजेकर, मा.सिद्धेश्वर बारणे यांचा प्रस्ताव...

कासारवाडी वॉर्ड क्र.१०० महिला शाळेमध्ये विविध कार्यक्रमासाठी सांस्कृतिक भवन बांधणेकामी र.रु.५०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- ३०० विषय क्रमांक :- १९
दिनांक :- ०७/५/२०१०
सुचक :-मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :-मा.सिद्धेश्वर बारणे
संदर्भ :- मा.स्मिता गुंजेकर, मा.सिद्धेश्वर बारणे यांचा प्रस्ताव...

कासारवाडी वॉर्ड क्र.१०० स्विमींग पूल शेजारी महिलांकरिता व्यायामशाळा करणेकामी र.रु.५०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- ३०१ विषय क्रमांक :- २०
दिनांक :- ०७/५/२०१०
सुचक :- मा.सिद्धेश्वर बारणे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.सिद्धेश्वर बारणे,मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव...

स्थापत्य विभागामधील उपअभियंता श्री.शरद दादाभाऊ जाधव यांचे पदोन्नतीने किंवा इतर पदोन्नतीमुळे अनुसूचित जाती या प्रवर्गातील उपअभियंता (स्थापत्य) या पदाच्या रिक्त होणाऱ्या जागेवर अनुसूचीत जाती या प्रवर्गातील पदवीधारक सेवाज्येष्ठतेमध्ये पहिले असलेले कनिष्ठ अभियंता, श्री. राजेंद्र कुंडलिक जावळे यांना उपअभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- ३०२ विषय क्रमांक :- २१
दिनांक :- ०७/५/२०१०
सुचक :- मा.सिद्धेश्वर बारणे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.सिद्धेश्वर बारणे,मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव...

संत तुकाराम नगर येथील वाय.सी.एम.हॉस्पीटल मध्ये सुयोग्य ठिकाणी कै.प्रा.रामकृष्ण मोरे यांचे तैलचित्र लावण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- ३०३ विषय क्रमांक :- २२
दिनांक :- ०७/५/२०१०
सुचक :- मा.सिद्धेश्वर बारणे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.सिद्धेश्वर बारणे,मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव...

२/- श्रीमती सुजाता बाजीराव शिंदे, (श्रीम. सुजाता अशोक गायकवाड) लिपिक सध्या नगरसचिव विभाग, यांची दि. २८।२।१९८४ नुसार लिपिक पदावर सहा महिने मुदतीसाठी हंगामी स्वरूपाची परिविक्षाधिनता तत्वावर (probationery period) नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार दि. १/३/१९८४ रोजी लिपिक पदावर त्या हजर झाल्या

होत्या. नियुक्ती आदेशाप्रमाणे सहा महिन्याचा परिविक्षाधिनता कालावधी समाधानकारक पार पाडल्याने शिक्षणमंडळाने दि. ३०/१/८५ व २१/२/८५ चे पत्रानुसार त्यांचे कामकाज समाधानकारक असल्याचे व वैद्यकीयदृष्ट्या कामास पात्र असल्याचे प्रशासन विभागास स्पष्टपणे कळविले होते. परिविक्षाधिनता कालावधी समाधानकारकरित्या पार पाडल्यानंतर लिपिक पदावर कार्यरत असताना दि. १०/६/८५ रोजी दुपार नंतर त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे सदर बाब वरिष्ठांना अवगत करून त्या उपचारासाठी गेल्या होत्या व त्यानंतर प्रकृती फारच बिघडल्यामुळे त्या वेळीच कामावर हजर होऊ शकल्या नाहीत. प्रकृती ठिक झाल्यानंतर त्यांनी दि. २८/४/९५ रोजी पुर्वीचे पदावर रूजू करून घेण्याबाबत अर्ज सादर केला होता.

त्यांच्या अर्जाचा विचार होऊन दि. १९/७/९५ चे आदेशानुसार त्यांना लिपिक पदाचे आदेश देण्यात आल्यानुसार त्या दि. २०/७/१९९५ रोजी लिपिक पदावर हजर झाल्या आहेत व त्यांचे काम समाधानकारक असल्याने दि. २४/१/९७ चे आदेशान्वये त्यांना कायम करण्यात आले आहे. त्या प्रकृती बिघडल्यामुळे कामावर हजर होवू शकल्या नसतानाच्या कालावधीत दि. २२/७/८५ रोजी त्यांचे सेवा समाप्तीचे आदेश निर्गत करण्यात आले होते.सदरचे आदेश रजि. पोष्टाने अथवा खास दुतामार्फत पाठविणेत आले नव्हते.तसेच सेवा समाप्तीबाबत वर्तमानपत्रात जाहीर निवेदन देण्यात आले नव्हते. सेवा समाप्तीचे आदेश कर्मचा-यास बजावले जात नाहीत तोपर्यंत त्याप्रमाणेची कृती प्रभावहीन ठरते. त्यामुळे श्रीम. शिंदे (श्रीम. गायकवाड) यांचे सेवा समाप्तीचे आदेश प्रभावहीन आहे.

परिविक्षाधिनता कर्मचा-याची नेमणूक नियमित आस्थापनेवर असते. त्या कालावधीत समाधानकारक काम केल्यास सेवा कमी करता येत नाही. परिविक्षाधिन कालावधी संपल्यानंतर कर्मचारी हा कायम कर्मचारी समजला जातो. त्यानंतर अशा कर्मचा-याला सेवेतून कमी करताना स्थायी कर्मचा-याचे निकष लावले जातात. गैरवर्तणुकीचा मुद्दा असेल तर घटनेच्या तरतूदी लागु होतात व रितसर चौकशी शिवाय सेवा समाप्त करता येत नाही. श्रीम. सुजाता शिंदे (श्रीम. सुजाता गायकवाड) यांचा परिविक्षाधिन कालावधी दि. १/३/१९८४ ते ३१/८/१९८४ या कालावधीत समाधानकारक पुर्ण झाल्याने त्यांची हंगामी सेवा संपून त्यांची सेवा कायम सेवेत गणली जात असल्यामुळे विना विभागीय चौकशी सेवा समाप्त करता येत नसल्यामुळे त्यांचे सेवा समाप्तीचे आदेश ग्राह्य धरता येणार नाहीत. सदर कृती घटना विरोधी आहे. कर्मचा-याविरूध्द जबर शिक्षेची कार्यवाही करताना संविधानाच्या तरतूदीनुसार वाजवी संधी दिल्याशिवाय कारवाई करता येत नाही. सदर प्रकरणात श्रीम. सुजाता शिंदे (सुजाता गायकवाड) यांची सेवा समाप्त करताना त्यांना घटनेनुसार कोणतीही वाजवी संधी देण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांचे सेवा समाप्तीचे आदेश घटना बाह्य आहेत. खातेनिहाय चौकशी करून दोषारोप सिध्द झाल्यानंतर सेवा समाप्तीचे आदेश निर्गमीत करणे आवश्यक होते. तथापि श्रीम. सुजाता शिंदे (श्रीम. सुजाता गायकवाड) यांचे सेवा समाप्तीचे आदेश काढताना या बाबी विचारात घेतल्या नाहीत त्यामुळे त्यांच्या सेवा समाप्तीचे दि. २२/७/८५ चे आदेश अवैध असून विधीग्राह्य नाहीत.

नियम तरतूदीनुसार कर्मचा-यास एखाद्या पदावर नेमणूक देण्यात आल्यानंतर त्याने परिविक्षाधीन कालावधी पुर्ण केल्यानंतर त्याचा त्या पदावरील धारणाधिकार अन्य

पदावर त्याचा जोपर्यंत स्थायी स्वरूपात धारणाधिकार निर्माण होत नाही तोपर्यंत रद्द करता येत नाही. त्यानुसार श्रीम. सुजाता शिंदे (श्रीम. सुजाता गायकवाड) यांचा दि. २८/२/८४ च्या आदेशानुसारचा प्रथम नियुक्तीचा लिपिक पदावरील धारणाधिकार कायम आहे. त्यामुळे तसे असताना त्यांचा सेवा समाप्तीचा आदेश विधीग्राह्य ठरणार नाही.

औद्योगीक विवाद कायद्यातील तरतूदीनुसार एखाद्या कामगाराने २४० दिवस सलग काम केले असेल तर तो कामगार कायम होण्यास हक्कदार असतो.अशा कामगाराविरूध्द त्याला वाजवी संधी दिल्याशिवाय त्याला सेवेतून काढून टाकण्याची कारवाई करता येत नाही. अशा प्रकारची कार्यवाही अन्याय कामगार कृतीमध्ये मोडते. सदर बाब विचारात घेता श्रीम. सुजाता शिंदे (सुजाता गायकवाड) यांचे सेवा समाप्तीचे दि. २२/७/८५चे आदेश औद्योगिक विवाद कायद्यातील तरतूदींचा भंग करणारे आहेत.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता श्रीम. सुजाता शिंदे (सुजाता गायकवाड) यांचे सेवा समाप्तीचे दि. २२/७/८५ चे आदेश पुर्णत: सदोष असून प्रचलीत सेवा विषयक नियमांचा भंग करणारे आहे. सदर आदेश एकतर्फी असून नैसर्गिक न्याय तत्वाला बाधा आणणारे असून घटनेच्या तरतूदींचा भंग करणारे आहे. त्यामुळे श्रीम. सुजाता शिंदे (श्रीम. सुजाता गायकवाड) यांचे सेवा समाप्तीचे दि. २२/७/८५ चे आदेश रद्द करून दि. ११/६/८५ ते १९/७/९५ हा कालावधी असाधारण रजा म्हणून गणण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- ३०४ विषय क्रमांक :- २३

दिनांक :- ०७/५/२०१०

सुचक :- मा.सिद्धेश्वर बारणे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर

संदर्भ :- मा.सिद्धेश्वर बारणे,मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव...

श्री.भाऊसाहेब व्यंकट खैरे हे प्रकल्पग्रस्त असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रिडा विभागांतर्गत सन १/२/०४ पासून म.न.पा.च्या शाळेत मानधनावरती क्रीडाशिक्षक म्हणून काम केलेले आहे. त्यांना प्रकल्पग्रस्तांच्या संवर्गातून रिक्त असलेल्या पाच क्रीडा शिक्षकांच्या पदातून आस्थापनेमध्ये कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव (प्रस्ताव क्र.क्रिडा/२अ/कावि/३५५/२००७ दि.२३/३/०७) पालिकेतील प्रशासन विभागाकडे दि.२८/३/०७ रोजी दाखल करण्यात आलेला आहे.

श्री.भाऊसाहेब व्यंकट खैरे यांची प्रकल्पग्रस्त असलेली नोंद जिल्हाधिकारी कार्यालय पूनर्वसन शाखा क्र.जि.पु.अ/नो.व.शी/३०५/२००६ पुणे दि.१५/७/२००६ येथील नोकरीविषयक जेष्ठता रजिस्टर वर्ग ३ क्र. ४५५४ वर नोंद केलेली आहे.

शिक्षण - B.A.B.Ed. (Phy.)

जन्मतारीख - २६/११/१९७२

त्यांना प्रकल्पग्रस्तांच्या संवर्गातून आस्थापनेत कायमस्वरुपी सामावून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/६०५/२०१०
दिनांक - १०/०५/२०१० चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.